मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# 31 जानेवारी 2026 पूर्वी निवडणूक होणारच!

## सर्वोच्च न्यायालयाकडून मुदतवाढ : पण, "निवडणूक घ्याच" असे आदेश

**पिंपरी | प्रतिनीधी**

महाराष्ट्रातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी जानेवारी २०२६ अखेरपर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी करणारा अर्ज राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात सादर केला होता. त्यावर मंगळवारी (१६ सप्टेंबर) सुनावणी पार पडली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने राज्य राज्य निवडणूक आयोगाला ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. निवडणूक आयोगाला आता ३१ जानेवारीपर्यंत या निवडणुका घ्याव्या लागतील.

त्यामुळे निवडणूक लांबणीवर पडेल, अशा भावनेतून निर्धास्त न राहता, इच्छुकांनी आणखी जोमाने कामाला लागण्याची आवश्यकता आहे. जानेवारी ३१ पर्यंत निवडणूक प्रक्रिया पूर्ण होणार असून, त्यासाठी केवळ ३ महिन्यांचा कालावधी तयारीसाठी उमेदवारांना मिळणार आहे.



सर्वोच्च न्यायालयात आज महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांप्रकरणी सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाकडून निवडणूक आयोगाला ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मुदवाढ मिळाली आहे. यामुळे निवडणूक आयोगासह राज्य सरकारला मोठा दिलासा मिळाला आहे. ही मुदतवाढ मिळावी यासाठी आयोगाने कर्मचाऱ्यांची कमतरता, ईव्हीएमचा मुद्दा, सणसमारंभासह वेगवेगळी कारणं दिली होती. न्यायालयाने आयोगाचे मुद्दे लक्षात घेत त्यांना निवडणुका घेण्यासाठी मुदतवाढ दिली आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेली चार-पाच वर्षे ओबीसी आरक्षणासह विविध कारणांमुळे लांबणीवर पडल्या होत्या. सर्वोच्च न्यायालयाने अखेरीस याप्रकरणी मे महिन्यात झालेल्या सुनावणीवेळी निवडणुकांना दिलेली स्थगिती उठविली आणि चार महिन्यांत म्हणजेच ऑक्टोबर २०२६ पर्यंत निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश निवडणूक आयोगाला दिले होते. त्यानुसार आयोगाने प्रभागांची पुनर्रचना, आरक्षणे, मतदारयाद्या अद्यायावत करणे, आदी प्रक्रिया सुरू केली आहे. मात्र, कर्मचाऱ्यांच्या कमतरतेसह इतर काही कारणे पुढे करत निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी मुदतवाढ मागितली होती. न्यायालयाने ही मागणी मान्य केली आहे.

### निवडणूक आयोग व राज्य सरकारच्या हलगर्जीपणावर बोट..

» दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने मुदतवाढ देताना स्पष्ट केलं आहे की ३१ जानेवारी २०२६ पर्यंत सर्व प्रकारच्या निवडणुका पार पडल्या पाहिजेत. तसेच, राज्य निवडणूक आयोगाने त्यांच्या ज्या मागण्या असतील त्यासंदर्भात राज्य सरकारकडे पाठपुरावा करावा असं सांगितलं आहे. सर्वोच्च न्यायालयाने आयोगाला सांगितलं आहे की ईव्हीएमची मागणी, कर्मचाऱ्यांची मागणी यासंदर्भात राज्याच्या मुख्य सचिवांना पत्र पाठवा. सर्व मागण्या कशा पूर्ण करता येतील, कामाचे टप्पे कसे असतील यासंदर्भात न्यायालयाने आयोगाला वेळापत्रक दिलं आहे. "मागील सुनावणीवेळी चार महिन्यात निवडणुका घेऊ म्हणणाऱ्या निडणूक आयोगाचा हलगर्दीपणा झाल्याचं दिसत आहे", अशी टिप्पणी देखील न्यायालयाने यावेळी केली.

---

# सोसायटीधारकांची ठाम भूमिका : "आम्हाला पाणी नाही; तर प्रचारासाठी 'एन्ट्री'सुद्धा नाही!

## मिशन महापालिका निवडणूक : लोटस नंदनवन सोसायटीची आक्रमक भूमिका, हंडा मोर्च्याचा इशारा

**पिंपरी | प्रतिनीधी**

"पाणी नसेल तर प्रचारासही नो एन्ट्री!" असा थेट इशारा देत मोशीतील लोटस नंदनवन सोसायटीने आता आंदोलनाची हाक दिली आहे. मुसळधार पावसाच्या सरी सुरु असतानाही, या सोसायटीतील रहिवाशांना दररोज चार ते पाच टँकरने पाणी विकत घ्यावे लागत आहे. गेली पाच वर्षे हेच चालू आहे, आणि आता सहनशक्तीचा बांध तुटला आहे.

महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे शेकडो वेळा तक्रारी करूनही काहीच उपयोग झाला नाही. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ढिसाळ, नियोजनशून्य आणि उदासीन कारभारामुळे नागरिकांच्या मूलभूत गरजांवरही गदा येत आहे.

पाणीपुरवठ्याचा आढावा घेण्यासाठी फेडरेशनचे अध्यक्ष श्री. संजीवन सांगळे यांनी महापालिकेचे कनिष्ठ अभियंता श्री. चेतन देवरे यांना थेट सोसायटीत आणून वस्तुस्थिती दाखवली. पाहणीनंतर चेतन देवरे यांनी, "दोन-तीन दिवसांत नियमानुसार पाणी मिळेल" असे आश्वासन दिले, मात्र अशा आश्वासनांचे आतापर्यंत कुठलेही फलित न दिसल्यामुळे नागरिक आता चिडले आहेत.



"धरणे तुडुंब भरली, पावसाचा जोर कायम, आणि तरीही आम्हाला पाणी नाही? हे कसले स्मार्ट सिटी मॉडेल?" असा संतप्त सवाल सोसायटीधारकांनी उपस्थित केला आहे.

पाणी नसेल, तर पुढाऱ्यांना नो एन्ट्री!

लोटस नंदनवन सोसायटीतील नागरिकांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की, "जर पुढील चार-पाच दिवसांत पाणीपुरवठा सुरळीत झाला नाही, तर कोणत्याही पक्षाच्या कोणत्याही नेत्याला सोसायटीमध्ये प्रचारासाठी येऊ दिले जाणार नाही."

### हंडा मोर्च्याचा इशारा...

» चिखली-मोशी-चऱ्होली-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनच्या नेतृत्वाखाली, पाणीपुरवठा बंद झाल्यास महापालिकेवर हंडा मोर्चा नेण्याचा इशारा देण्यात आला आहे. महिलांचा सहभाग ठळक असणार असून, या आंदोलनात हजारोंच्या संख्येने रहिवासी सहभागी होणार आहेत.

> "पिंपरी चिंचवड शहर स्मार्ट सिटी म्हणून गाजवले जात असले तरी काही भागांत लोकांना पावसाळ्यात सुद्धा पैसे देऊन पाणी विकत घ्यावं लागतं हे दुर्दैवी आहे. जर पाणीपुरवठा सुरळीत झाला नाही तर हंडा मोर्चा निघणारच आणि कोणत्याही पुढाऱ्याला निवडणुकीत सोसायटीत पाय ठेवू दिला जाणार नाही.
> - **संजीवन सांगळे, अध्यक्ष, सोसायटी फेडरेशन.**

हा निर्णय एका सामूहिक बैठकीत घेण्यात आला आणि या निर्णयाला संपूर्ण सोसायटीचा पाठिंबा आहे.

# 'अर्थसंकल्पात नागरी सहभाग' उपक्रमाला विक्रमी प्रतिसाद

## 5 हजार 102 नागरिकांचे अभिप्राय प्राप्त; रस्ते, कचरा व्यवस्थापन आणि पाणीपुरवठा अग्रक्रमावर

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या 'अर्थसंकल्पात नागरी सहभाग' या उपक्रमाला विक्रमी प्रतिसाद मिळाला आहे. अर्थसंकल्प २०२६–२७ साठी तब्बल ५ हजार १०२ नागरिकांचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत. हे प्रमाण मागील वर्षीपेक्षा दुप्पट आहे. गेल्या वर्षी या उपक्रमांतर्गत २ हजार २७९ नागरिकांचे अभिप्राय प्राप्त झाले होते. यंदा १५ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२५ या कालावधीत हा उपक्रम राबविण्यात आला असून शहरातील सर्व आठ प्रभागांमधील रहिवाशांचा त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.




यामध्ये प्रभाग 'ड' मधून सर्वात जास्त १ हजार १६१ अभिप्राय प्राप्त झाले आहेत. अभिप्राय पाठवण्यासाठी तीन दिवस बाकी असताना म्हणजेच १३ ते १५ सप्टेंबर २०२५ या काळात तब्बल २ हजार पेक्षा जास्त नागरिकांनी यामध्ये सहभाग नोंदवला आहे.

अर्थसंकल्पात नागरी सहभाग उपक्रमांतर्गत नागरिकांनी सुचवलेल्या योजनांसाठी त्यांच्या परिसरात वसूल होणाऱ्या मालमत्ता कराच्या १० टक्के निधीची तरतूद केली जाते. यंदा या उपक्रमाला मिळालेल्या प्रतिसादातून नागरिकांचा महापालिकेवरील वाढता विश्वास दिसून आला आहे. या अभिप्रायांमध्ये रस्ते विकास, घनकचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा सुधारणा, उद्याने, पावसाच्या पाण्याचा निचरा आणि सार्वजनिक सोयीसुविधा यांचा समावेश होता.

**प्रभागनिहाय प्राप्त अभिप्राय**

प्रभाग अ – ६३५
प्रभाग ब – ७५५
प्रभाग क – ५७८
प्रभाग ड – ११६१
प्रभाग ई – ५७९
प्रभाग ग – ४८८
प्रभाग ह – ४१४
प्रभाग फ – ४९२
एकूण प्रतिसाद: ५,१०२

> अर्थसंकल्पात नागरी सहभाग उपक्रमामध्ये ५ हजार १०० हून अधिक नागरिकांनी प्रतिसाद देणे हे पिंपरी चिंचवड शहरातील वाढत्या नागरी सहभागाचे प्रतीक आहे. नागरिकांच्या या सूचनांमुळे वर्ष २०२६–२७ चा अर्थसंकल्प हा अधिक प्रतिसादक्षम आणि समावेशक तयार करण्यास मदत होईल. नागरिकांकडून आलेल्या सूचनांचे तांत्रिक परीक्षण करून त्यानंतर मंजूर कामांची अंतिम यादी जाहीर करण्यात येईल. या कामांचा आर्थिक वर्ष २०२६–२७ च्या अर्थसंकल्पात समावेश करण्यात येईल.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक,**
> **पिंपरी-चिंचवड महापालिका.**

### अभिप्रायात प्राधान्य दिलेली कामे

- रस्ते: १ हजार २६५
- घनकचरा व्यवस्थापन: ५९८
- पाणीपुरवठा: ४५८
- उद्याने व खेळाची मैदाने: ४०४
- पावसाच्या पाण्याचा निचरा: ३०७
- सार्वजनिक स्वच्छतागृह: ३०३

# रस्त्यावरील खडीमुळे अपघाताच्या प्रमाणात वाढ

## रस्त्यावरील खड्डयामुळे अपघाताचे प्रमाण वाढले; रस्त्याची दुरुस्ती करण्याची नागरिकांची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

परिसरातील बीआरटी रस्त्यावर उघड्यावर आलेली बारीक खडी, रस्त्यावरील खड्डे यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. या खड्डयावरून दुचाकीस्वार मोठ्या प्रमाणात जखमी होत असून, लवकरात-लवकर रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात येत आहे.

मोशीतील मुख्य चौक म्हणजे भारतामाता चौक रहदारीचा अन् वाहतूक कोंडीचा हा चौक ओळखला जातो. या चौकात पावसामुळे मोठे-मोठे खड्डे पडले आहे. पालिकेने फक्त खडी, माती अन् काँक्रेट टाकून खड्डे बुजविले आहेत. मात्र सध्या जोरदार झालेल्या पावसामुळे खडी व माती वेगळी होऊन ती रस्त्यावर पसरली जाते आहे. या बारीक खडीमुळेच अपघात घडून येत आहेत.



> मागील महिन्यात चाकण एमआयडीसीमधील एका तरूणाचा या रस्त्यात अपघाता झाला. दुचाकी सातत्याने घसरून पडतात. परिसरात शाळा भरपूर आहेत. अनेक पालक लहान मुलांना शाळेत नेताना या खडीमुळे धोक्याच्या सावटाखाली येत आहेत. त्यामुळे प्रशासनाने लवकरात-लवकर लक्ष घालून दुरुस्ती करावी.
>
> **- वसंत बोराटे,**
> **मा.नगरसेवक.**

> रस्त्याच्या दुरुस्तीसाठी महापालिका प्रशासनाला सांगितल्यानंतर तात्पुरती डागडुजी करण्यात येते. पाऊस झाला की, रस्ता जैसे थे होतो. सध्याची स्थिती रस्त्याची अशीच झाली आहे. त्यामुळे अपघाताची मालिका सुरु आहे. लवकरात-लवकर रस्ता दुरुस्त करावा.
>
> **- प्रा. कविता आल्हाट, शहराध्यक्षा.**

> मोई चौक ते भारतमाता चौकातील रस्त्याचे काम बीआरटी विभागा अंतर्गत येते. मात्र समन्वय साधून लवकरात-लवकर रस्ता दुरुस्तीचे काम मार्गी लावू.
>
> **- सुनीलदत्त नरोटे,**
> **क प्रभाग स्थापत्य विभाग.**

# तब्बल सव्वादोनशे अतिक्रमणांवर हातोडा!

## उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या आदेशानंतर सुरू झालेली चाकणमधील थेट कारवाई सुरूच

**पुणे | प्रतिनिधी**

चाकण औद्योगिक क्षेत्रासह (एमआयडीसी) परिसरातील वाहतूक कोंडी आणि नागरी समस्या तातडीने सोडविण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले होते. त्यानंतर पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासह (पीएमआरडीए) इतर शासकीय यंत्रणांच्या माध्यमातून चाकण भागातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी अतिक्रमण निर्मूलनाची मोहीम राबविण्यात येत आहे. आतापर्यंत सव्वा दोनशेपेक्षा अधिक अनधिकृत बांधकाम व अतिक्रमणावर कारवाई करण्यात आली आहे. ही कारवाई आणखी काही दिवस सुरू राहणार असल्याने या परिसरातील वाहतूक कोंडी कमी होऊन नागरी समस्या सोडवण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे.




चाकण एमआयडीसीसह परिसरातील अनाधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे काढण्यासाठी १० सप्टेंबरपासून संयुक्तरित्या मोहीम राबविण्यात येत आहे. यात पुणे नाशिक महामार्ग- चाकण चौक ते एकतानगर, पुणे महामार्ग- एकतानगर ते चाकण चौक, तळेगाव चाकण शिक्रापूर- चाकण चौक ते तळेगाव, तळेगाव चाकण शिक्रापूर रस्ता व चाकण चौक ते शिक्रापूर या भागातील एकूण २३१ अतिक्रमणे पोलीस बंदोबस्तात काढण्यात आली. पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे, अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला यांनी चाकण भागातील अनाधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणावर कारवाईच्या अनुषंगाने संबंधित प्रशासकीय यंत्रणांना निर्देश दिले होते.

या रस्त्यावरील अतिक्रमणधारकांनी स्वतःहून आपली अतिक्रमणे काढून घ्यावी, अशा नोटिसा संबंधितांना देण्यात आल्या होत्या. मात्र याकडे त्यांनी दुर्लक्ष केल्यामुळे अतिक्रमण निर्मूलनाची मोहीम राबवण्यात येत आहे. संबंधित अनाधिकृत बांधकामे व अतिक्रमणावर निर्मूलनाची कारवाई पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यासह भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, चाकण नगरपरिषद, एमएसआयडीसी या प्रशासकीय यंत्रणांच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

### चाकण भागात केलेल्या कारवाईची आकडेवारी

१) १० सप्टेंबर – पुणे नाशिक महामार्ग- चाकण चौक ते एकतानगरमधील (३.१ कि.मी) एकाबाजूची ४० अनाधिकृत बांधकामे हटवली
२) ११ सप्टेंबर – पुणे महामार्ग- एकतानगर ते चाकण चौक भागातील (३.१ किमी) दुसऱ्या बाजूची ११० अनाधिकृत बांधकामावर कारवाई
३) १२ सप्टेंबर – तळेगाव चाकण शिक्रापूर- चाकण चौक ते तळेगाव भागातील दोन्ही बाजूची (१.५ किमी) ४२ अनाधिकृत बांधकामे काढली
४) १५ सप्टेंबर – तळेगाव चाकण शिक्रापूर सहयोग- चाकण चौक ते शिक्रापूरमध्ये दोन्ही बाजूची (१.३ किमी) रस्ता मोकळा करून ३९ अनाधिकृत बांधकामे हटवली.

### उपमुख्यमंत्र्यांचा पुढाकार

हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमधील अपुऱ्या पायाभूत सुविधांवरून मोठा गदारोळ झाला होता. त्यानंतर चाकण औद्योगिक वसाहतीतील उद्योगांना भेडसावणाऱ्या समस्यांचा मुद्दा चर्चेत आला. वाहतूक कोंडीसह पायाभूत सुविधांच्या अभावामुळे चाकणमधील उद्योग अडचणीत आले आहेत. अखेर याची गंभीर दखल घेऊन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जुलै महिन्यात मुंबईत उच्चस्तरीय बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी सर्व यंत्रणांची झाडाझडती घेऊन उद्योगांची कोंडी सोडविण्याचे निर्देश दिले. यानंतर ऑगस्ट महिन्यात उपमुख्यमंत्र्यांनी चाकणचा पहाटे दौरा करून शासकीय यंत्रांची झाडझडती घेतली होती. विकास कामे तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश त्यावेळी त्यांनी दिले होते.

# कात्रज ते हिंजवडी इलेक्ट्रिक डबलडेकर बसची चाचणी यशस्वी

## वाहतूक कोंडीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून आयटी क्षेत्रात डबलडेकर बस सुरु करण्याचा निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

चेन्नई येथील ‘स्विच’ कंपनीकडून मागविण्यात आलेली वातानुकूलित इलेक्ट्रिक ‘डबल डेकर’ बस मंगळवार (दि. १६) रोजी दाखल झाली. त्यानंतर हिंजवडी, खराडी आणि मगरपट्टा ‘आयटी हब’कडे जाणाऱ्या रस्त्यांवर चाचणी घेण्यात येणार आहे. ‘बृहनमुंबई इलेक्ट्रीक सप्लाय अ‍ॅण्ड ट्रान्सपोर्ट’च्या (बेस्ट) धर्तीवर पुणे, पिंपरी-चिंचवड आणि उपनगरातील सार्वजनिक वाहूतक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी डबल डेकर बस पीएमपी ताफ्यात दाखल करण्याचे नियोजन प्रशासनाचे आहे. पुढील पंधरा दिवस डबल डेकर बसची चाचणी घेतली जाणार आहे.




पीएमपी प्रशासनाने गेल्या पाच वर्षांपासून डबल डेकर बस ताफ्यात दाखल करण्याचे नियोजन करत होते. परंतु त्याला मूर्त स्वरूप आले नाही. नव्याने दाखल झालेले अध्यक्ष पंकज देवरे यांनी याबाबत प्रस्ताव तयार करून वाहतूक कोंडीवर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून आयटी क्षेत्रात डबलडेकर बस सुरू करण्याचा निर्णय घेतला. याबाबत चेन्नईतील स्विच कंपनीसोबत बैठक घेऊन चाचणी घेण्यासाठी पथकाला निमंत्रण देण्यात आले आहे. मंगळवारी ही बस पुण्यात दाखल झाल्यानंतर पीएमपीचे अध्यक्ष व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून या फेरी मारून चाचणीला सुरुवात झाली. यावेळी पीएमपीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पंकज देवरे, मुख्य वाहतूक व्यवस्थापक सतीश गव्हाणे व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### अशी आहे डबल डेकर बस

- एकूण ६० सेटिंग आणि २५ स्टँडिंग अशी ८५ प्रवाशांची क्षमता आहे.
- पहिल्या टप्प्यात दहा बस पीएमपीच्या ताब्यात आणण्याचे नियोजन आहे.
- स्विच कंपनीची बस आहे.
- बसची उंची ४.७५ मीटर.
- बसची रुंदी २.६ मीटर.
- बसची लांबी ९.५ मीटर आहे.
- बस संपूर्ण वातानुकूलित इलेक्ट्रिक असून, दोन कोटी रुपये किंमत आहे.

# मावळातील राष्ट्रवादी पदाधिकाऱ्यांचा भाजपमध्ये प्रवेश

## दोन माजी जि. प. सभापती, तीन माजी उपनगराध्यक्ष, खरेदी-विक्री संघ, बाजार समिती संचालकांचा समावेश

**पुणे | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या दोन माजी सभापती, तीन माजी उपनगराध्यक्ष, खरेदी-विक्री संघ, बाजार समितीचे संचालक यांच्यासह राष्ट्रवादीच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी आज मुंबई येथे भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत आणि माजी राज्यमंत्री संजय भेगडे यांच्या नेतृत्वाखाली भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

दरम्यान, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा प्रवेश राजकीय दृष्ट्या महत्त्वाचा ठरणार आहे. मुंबई येथे भाजपच्या प्रदेश कार्यालयात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सर्वांचे स्वागत करून पक्षात अधिकृत प्रवेश दिला.

या वेळी माजी राज्यमंत्री संजय बाळा भेगडे, भाजप किसान मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष गणेश भेगडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद, मावळ विधानसभा निवडणूकप्रमुख रवींद्र भेगडे, माजी सभापती निवृत्ती शेटे, शांताराम कदम, रवींद्रनाथ दाभाडे, मंडलाध्यक्ष अभिमन्यू शिंदे, दत्तात्रय माळी, रघुवीर शेलार, वडगाव शहराध्यक्ष संभाजीराव म्हाळसकर आदी उपस्थित होते.

प्रदेशाध्यक्ष चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सर्वसमावेशक नेतृत्वाखाली देश आणि राज्याच्या प्रगतीचा नवा अध्याय रचला जातोय. भाजपच्या विकासाच्या राजकारणावर विश्वास ठेवून आज या सर्वांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.



**बापूसाहेब भेगडे यांची अनुपस्थिती; प्रवेश लवकरच !**

भाजपमध्ये होणारे प्रवेश हे बापूसाहेब भेगडे यांच्या नेतृत्वाखाली होणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते, परंतु या वेळी त्यांच्याच समर्थकांचा प्रवेश झाला. या प्रवेश समारंभास बापूसाहेब भेगडे हेच अनुपस्थित होते. दरम्यान, ते काही कारणास्तव बाहेगावी असल्याने ते अनुपस्थित असून, लवकरच त्यांचा व इतर कार्यकर्त्यांचा भव्य पक्षप्रवेश होणार असल्याचे या वेळी उपस्थितांनी सांगितले.

### ...यांचा झाला पक्षप्रवेश

» दरम्यान, प्रवेश करणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने जिल्हा परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन समितीचे माजी सभापती बाबूराव वायकर, जिल्हा परिषद समाजकल्याण समितीचे माजी सभापती अतीश परदेशी, तळेगावचे माजी उपनगराध्यक्ष नेते रामदास काकडे, उपनगराध्यक्ष किशोर भेगडे, माजी उपनगराध्यक्ष संग्राम काकडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुभाषराव जाधव, राष्ट्रवादी युवकचे माजी जिल्हाध्यक्ष सचिन घोटकुले, जिल्हा उपाध्यक्ष संतोष मुऱ्हे, खरेदी-विक्री संघाचे सभापती शिवाजी असवले, संचालक बाजीराव वाजे, माजी नगरसेवक अरुण माने, पोटोबा महाराज देवस्थानचे विश्वस्त अरुण चव्हाण आदी प्रमुख पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे.

### आता मावळ काँग्रेसला माऊली दाभाडेंचाच आधार

» तालुक्याच्या राजकारणात महत्त्वाचा घटक असलेल्या काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत नेते पै. चंद्रकांत सातकर यांचे नुकतेच निधन झाल्याने काँग्रेस कार्यकर्त्यांचा आधार गेल्याची भावना कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत असताना आज दुसरे नेते रामदास काकडे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यामुळे आता तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांना जिल्हा बँकेचे संचालक माऊली दाभाडे यांचाच आधार राहिला आहे.

# तब्बल तीन पोती चांदी चोरी करून चोरटे पसार

## 62 लाखांची चांदी, तर पाच लाखांची रोकड चोरी; आरोपींच्या शोधासाठी पथके रवाना

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील गुरुवार पेठेतील तब्बल 40 वर्षे जुन्या असलेल्या सराफी पेढीवर चोरट्यांनी डल्ला मारून तब्बल तीन पोती चांदीचे 67 लाख 60 हजारांचे 70 किलोहून अधिक दागिने चोरून नेले. यामध्ये 62 लाखांची चांदी तर पाच लाखांच्या रोकडचा समावेश आहे.

ही चांदीने भरलेली पोती (सिमेंटच्या गोणीच्या आकाराची) वाहून नेतानाचा व्हिडीओ पोलिसांच्या हाती लागला असून, आरोपींच्या शोधासाठी पथके रवाना केली आहेत. विनोद देवीचंद परमार (वय 41, रा. मुकुंदनगर) यांनी खडक पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात तीन चोरट्यांवर गुन्हा दाखल केला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, परमार यांचे 381 गुरुवार पेठ येथे माणिक ज्वेलर्स नावाचे दुकान आहे. या सराफी दुकानाला लाकडी दरवाजे आहेत. शेजारीच मोठ्या ज्वेलर्सची दुकाने आहेत. त्या ठिकाणी सुरक्षारक्षक नेमलेले आहेत. परंतु, या ठिकाणी सुरक्षारक्षक नसल्याचा व दुकानाला लाकडी दरवाजे असल्याचा फायदा चोरट्यांनी घेतला.

सोमवारी (दि.15) मध्यरात्री पावणे दोन वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी हे माणिक ज्वेलर्सचे दुकानाचे दरवाजे कटावणीच्या साह्याने तोडले. आतमध्ये शिरल्यानंतर समोरच्या कपाटामध्ये त्यांना मोठ्या प्रमाणावर चांदी असल्याचे दिसली.

त्यांनी चांदीचे पैजण, चांदीचे बेसलेट, देवाच्या मूर्ती, नाणी ही सोबत असलेल्या सिमेंटच्या पोत्यात भरली. तसेच, दुकानात असलेली पाच लाखांची रोकड चोरट्यांनी ताब्यात घेतली. चांदीने भरलेली तीन पोती उचल्यास जड असल्याने चोरट्यांनी शेवटी तीन पोती खांद्यावर वाहून नेली.

या दुकानात काम करणारे कामगार जवळच समोरच्या बिल्डिंगमध्ये राहतात. सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास त्यांना दुकान फोडलेले दिसल्यानंतर त्यांनी तत्काळ याबाबतची माहिती आपल्या मालकांना दिली. त्यानंतर मालकांनी तत्काळ दुकानाकडे धाव घेतली. यानंतर पोलिसांनी याची खबर दिल्यानंतर पोलिसांनी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. या घरफोडीत तब्बल 70 किलोहून अधिक चांदी, पाच लाखांची रोकड चोरट्यांनी चोरी करून नेली.

चोरीच्या या प्रकारानंतर खडक पोलिसांची दोन पथके व गुन्हे शाखेची दोन पथके तपासासाठी रवाना केली आहेत. चोरट्यांचा चांदी वाहून नेतानाचा सीसीटीव्ही पोलिसांच्या हाती लागला असून, चोर चोरी करण्यासाठी पायी आल्याचे सीसीटीव्ही फुटेजवरून स्पष्ट झाले आहे. अर्धा तास चोर ज्वेलर्स शॉपमध्ये होते.

### पोलिसांकडून शोध सुरू

» चांदीचे होलसेल व्यापारी असल्याने मोठ्या प्रमाणात चांदीचे दागिने शॉपमध्ये होते. चोरांनी 40 लाख रुपयांचे 45 किलो वजनाचे चांदीचे पैंजण, 13 लाख 50 हजार रुपयांचे 15 किलो वजनाचे हातातील कडे, चैन, बेसलेट, मासोळी, चांदीचे कॉईन, नऊ लाख रुपये किमतीचे 10 किलो वजनाचे गणपती, लक्ष्मी, स्वामी समर्थ, गजानन महाराज यांच्या चांदीच्या मूर्ती, पाच लाख रुपये रोख आणि 10 हजारांचा डीव्हीआर असा 67 लाख 60 रुपये किमतीचा ऐवज गोणीत टाकून चोरून नेला. या आधारे पोलिसांचा शोध सुरू आहे.